| | | | |
|---|---|---|---|
| MHGA120000762024 | दाखल तारीख | :- | २३.१०.२०२४ |
| | नोंदणी तारीख | :- | २३.१०.२०२४ |
| | निकाल तारीख | :- | १०.०६.२०२६ |
| | कालावधी | :- | ०१वर्षे ०७ महिना १८दिवस |
| | **निशाणी क्रमांक ०८ सलग** | | |

**भाग ''अ''**

**{फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i)}**

| | | |
|---|---|---|
| | **कोरची येथील ग्राम–न्यायालयात, जिल्हा–गडचिरोली**<br>**पिठासीन अधिकारी : एन.पी. देशपांडे**<br>**न्यायाधिकारी, ग्राम–न्यायालय,** | |
| | **न्यायनिर्णय दिनांक १० जुन, २०२६ रोजी** | |
| | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ६४/२०२४** | |
| | अपराध क्रमांक १९/२०२४, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई), पोलीस स्टेशन कोरची, तालुका–कोरची, जिल्हा :– गडचिरोली | |
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासनतर्फे,<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे कोरची,<br>जिल्हा–गडचिरोली. |
| **अभियोग पक्षातर्फे** | विद्वान सहाय्यक सरकारी वकील श्री. ए.पी. नाकाडे | |
| **आरोपी** | | **वच्छला प्रताप वालदे,**<br>वय:– ४९ वर्षे, धंदा :– मजुरी,<br>राहणार – कोरची वार्ड क्र.४,<br>जिल्हा–गडचिरोली. |
| **आरोपींतर्फे** | | विद्वान विधीज्ञ श्री. जि.एम. नागमोती |

**भाग ''ब''**

**{फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i)}**

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | २९/०२/२०२४ |
| पहिली खबरीची तारीख | २९/०२/२०२४ |
| दोषारोपत्राची तारीख | २३/१०/२०२४ |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | १३/११/२०२४ |
| जबाब नोंदणी सुरू झाल्याची तारीख | ११/१२/२०२४ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | --- |
| न्यायनिर्णयाची तारीख | १०/०६/२०२६ |
| शिक्षा आदेशाची तारीख, असल्यास | --- |

**आरोपींचा तपशील :**

| आरोपीचे स्थान | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोपातील गुन्हे | निर्दोष मुक्त अथवा शिक्षा | लादलेली शिक्षा | खटल्याची प्रकिया सुरू असतांना आरोपी न्यायाधीनबंदी असल्याचा फौ.प्र.सं. च्या कलम ४२८ प्रमाणे सुट मिळण्यासाठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | **वच्छला प्रताप वालदे** | -- | २३/१०/२४ | कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा | निर्दोष मुक्त. | निरंक. | लागु नाही. |

**भाग ''क''**
**{फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i)}**
**सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन साक्षदारांची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| स्थान | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| स.सा.१ | मनोज सखाराम भानारकर | घटनास्थळ जप्ती पंचनाम्याचे पंच साक्षीदार |
| स.सा.२ | राजकुमार पंढरी गुरनुले | घटनास्थळ जप्ती पंचनाम्याचे पंच साक्षीदार |

**ब. बचाव, असल्यास :**

| **स्थान** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –निरंक.– | |

**क. बचाव न्यायालयीन साक्षदार, असल्यास :**

| **स्थान** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –निरंक.– | |

**सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणींची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**ब. बचावपक्ष :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १) | नि.क्र.१२ | रासायनिक विश्लेषन अहवाल |

**ड. महत्वाचे वस्तु :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

---

**दोषारोप : महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये**

---

**<u>न्यायनिर्णय</u>**

(दिनांक १० जुन, २०२६ रोजी घोषित)

आरोपी विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) नुसार शिक्षापात्र अपराधासाठी संपरिक्षा चालविण्यात आली.

२. खटल्यातील आलेल्या माहीतीवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २९.०२.२०२४ रोजीचे १७.१० ते १७.५० वाजताच्या मौजा कोरची वार्ड क्र. ४ येथे आरोपीचे राहते घरासमोर घरझडतीत तिचे ताब्यात ०८ लिटर मोहाफुलाची दारू अवैधरीत्या विनापरवाना बाळगतांना मिळुन आली व त्यानुसार तिने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? ... | नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>कारणमिमांसा</u>**

३. आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने पंच साक्षीदार क्र. १ मनोज सखाराम भानारकर व साक्षीदार क्रमांक २ राजकुमार पंढरी गुरनुले यांची नि.क्र.०८ वर साक्ष नोंदविली. विद्वान सरकारी वकीलांनी निशाणी क्र.११ प्रमाणे अभीयोग पक्षाचा पुरावा संपवला. खटला चालवित असतांना आरोपी विरुध्द गुन्हया संदर्भात कोणतीही विधाने आलेली नसल्यामुळे निशाणी क्र.०१ खाली आदेश दिनांक १३.०५.२०२६ नुसार भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे आरोपीची जबानी नोंदविण्यात आली नाही. आरोपीचा बचाव त्यांनी गुन्हा केला नाही असा आहे. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u> –**

४. आरोपी वरील महाराष्ट्र दारूबंदी कायदयाचे कलम ६५(ई) दोषारोप सिध्द करतांना अभियोग पक्षाला आरोपीचे घरझडतीत तिचे ताब्यात ०८ लिटर मोहाफुलाची दारू अवैधरीत्या विनापरवाना बाळगतांना मिळुन आली ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

५. अभियोग पक्षाने घटनास्थळ व मोका जप्ती पंचनाम्याचे पंच म्हणून साक्षीदार क्र. १ मनोज सखाराम भानारकर व साक्षीदार क्रमांक २ राजकुमार पंढरी गुरनुले यांची नि.क्र.०८ वर तपासले. सदरचे दोन्ही साक्षीदारांनी दिनांक २९.०२.२०२४ रोजीचे घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील मजकुर नाकारला आहे. विद्वान सरकारी वकीलांनी त्यांना उलटतपासात ग्राहय असणारे प्रश्न विचारले, त्यामध्ये त्यांनी दिनांक २९.०२.२०२४ रोजी पोलीसांनी त्यांना मौजा कोरची येथे आरोपीच्या घरी घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यासाठी बोलाविले व त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यात ०८ लिटर मोहाफुलाची दारू जप्त केल्याचे नाकारले आहे. त्यामुळे, प्रस्तुत साक्षीदारांच्या पुराव्यावरुन आरोपीच्या झडतीत तिचे ताब्यातून जप्ती सिध्द झाली नाही. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे जप्त मुद्देमालाचा रासायनिक पृथ्थ:करणाचा अहवाल नि.क्र.१२ वर दाखल केलेला असला तरी आरोपीचे ताब्यातून जप्ती सिद्ध झाली नाही. त्यामुळे आरोपी

विरूध्द ठेवलेले महाराष्ट्र दारूबंदी कायदयाचे कलम ६५(ई) चे दोषारोप सिध्द होत नाहीत. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देतो.

**मुद्दा क्र. २ करीता** –

६. जप्त मुद्देमालापैकी मोहा दारू ही जागीच नष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर लक्षात घेता मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी **वच्छला प्रताप वालदे** हिला महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) च्या दंडनिय अपराधातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) अन्वये दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे पुर्वीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल ०८ लिटर मोहा दारू ही जागीच नाश केली असल्यामुळे त्याबाबत काहीही आदेश नाही.

४. आरोपीने अपील दाखल झाल्यास मा. अपील न्यायालयासमोर हजर राहण्यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ प्रमाणे अपील कालावधी पर्यंत रक्कम रू.१०,०००/– किंमतीचे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रक्कमेचे जामीनदाराचे बंधपत्र सादर करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by NAGESH PRABHAKAR DESHPANDE
Date: 2026.06.10 18:05:22 +0530

(एन.पी. देशपांडे)
न्यायाधिकारी
ग्राम–न्यायालय, कोरची.

दिनांक : १०.०६.२०२६
स्थळ :– कोरची.